१०८

## MAHARASHTRA ACT No. XVI OF 1983

## THE MAHARASHTRA SUPPLY OF FOREST PRODUCED BY GOVERNMENT (REVISION OF AGREEMENTS) ACT, 1982.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपति यांची संमती दिनांक २१ मार्च १९८३ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम. ए. धोत्रे,

सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XVI OF 1983.

## AN ACT TO TAKE POWERS TO REVISE CERTAIN AGREEMENTS TO GET FAIR PRICE FOR FOREST PRODUCE SUPPLIED BY GOVERNMENT TO PURCHASERS FOR LONG TERM PERIODS AND FOR CERTAIN OTHER MATTERS.

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २३ मार्च १९८३ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ].

## सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.

**दीर्घ मुदतीसाठी खरेदीदारांना शासनाकडून पुरवण्यात येणाऱ्या वनोत्पादनाकरिता रास्त भाव मिळण्यासाठी व विवक्षित इतर बाबींसाठी विवक्षित करारांमध्ये सुधारणा करण्याचे अधिकार घेण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, दीर्घ मुदतीसाठी खरेदीदारांना राज्य शासनाकडून विकण्यात येणाऱ्या किंवा पुरवण्यात येणाऱ्या वनोत्पादनाकरिता रास्त भाव मिळण्यासाठी व शासनाला मिळणाऱ्या उत्पन्नातील हानीस प्रतिबंध करण्यासाठी विवक्षित करारांमध्ये, वेळोवेळी सुधारणा करण्याचा व सुधारित करार अंमलात आणण्याचा आणि त्याच्याशी संबंधित असलेल्या बाबींसाठी तरतूद करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेणे इष्ट आहे, त्याअर्थी, आता भारतीय गणराज्याच्या तेहतिसाव्या वर्षी याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ति व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र शासनाद्वारे वनोत्पादनाचा पुरवठा (करार सुधारणा) अधिनियम, १९८२ असे म्हणता येईल.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेस अंमलात येईल.

व्याख्या. २. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात—

(अ) "करार" या संज्ञेत, राज्य शासनाने, ज्याद्वारे दस्तऐवजात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अटी व शर्तींवर, दीर्घ मुदतीसाठी, कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही वनोत्पादनाची विक्री करण्यास किंवा ते पुरविण्यास किंवा कोणत्याही व्यक्तीकडून मोबदल्यावर कोणतेही वनोत्पादन गोळा केले जाण्यास किंवा तेथून ते हलविले जाण्यास संमती दिलेली असेल असे कोणतेही कंत्राट, लायसन, बंधपत्र, विलेख किंवा इतर दस्तऐवज यांचा समावेश होईल ;

(ब) "वनोत्पादन" या संज्ञेस, भारतीय वन अधिनियम, १९२७ हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच तिचा अर्थ असेल ; १९२७ चा १६.

(क) "दीर्घ मुदत" म्हणजे, बारा महिन्यांपेक्षा अधिक होत असेल अशी कोणतीही मुदत ;

(ड) "विहित" म्हणजे, या अधिनियमाखाली राज्य शासनाने केलेल्या नियमांद्वारे विहित ;

(इ) "खरेदीदार" म्हणजे जी कोणत्याही करारान्वये राज्य शासनाकडून कोणतेही वनोत्पादन खरेदी करत असेल, किंवा तिला त्याचा पुरवठा होत असेल किंवा ती ते प्राप्त करीत असेल अशी कोणतीही व्यक्ती व त्यामध्ये कोणतीही कंपनी किंवा समूह किंवा व्यक्तींची मंडळी, मग ती विधिद्वारा संस्थापित असो वा नसो—त्यांचा समावेश होईल.

वनोत्पादनाच्या विक्रीच्या किंवा पुरवठाच्या करारात सुधारणा करण्याचा शासनाचा अधिकार.

३. त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस अस्तित्वात असलेल्या कोणत्याही करारात, किंवा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस किंवा त्या तारखेनंतर राज्य शासन, कोणत्याही खरेदीदाराशी करील अशा कोणत्याही करारात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाने पुढील एका किंवा अधिक प्रयोजनांसाठी शासकीय राजपत्रात, प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, कोणत्याही अशा कराराच्या कोणत्याही अटी व शर्ती यात भर घालणे, त्याऐवजी दुसरी दाखल करणे, त्या वगळणे किंवा अन्यथा त्यात सुधारणा करणे विधिसंमत असेल :—

(अ) जर अशा करारात, खरेदीदाराला वनोत्पादनाची विक्री किंवा पुरवठा करण्याच्या किंमतीत किंवा दरात यथास्थिति सुधारणा किंवा नियतकालिक सुधारणा करण्याची तरतूद करण्यात आलेली नसेल, तर, कोणतीही अशी सुधारणा किंवा नियतकालिक सुधारणा करण्यासाठी तरतूद करणे, आणि करारात अशी नियतकालिक सुधारणा करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली असेल तर सुधारणा करण्याचा कालावधी कमी करण्यासाठी किंवा तो वाढविण्यासाठी तरतूद करणे :

परंतु, राज्य शासनाला एकदा निश्चित केलेल्या किंमतीत किंवा दरात, अशी किंमत किंवा दर ज्या तारखेस अंमलात आला असेल त्या तारखेपासून निदान बारा महिन्यांच्या मुदतीसाठी सुधारणा करता येणार नाही ;

(ब) खरेदीदाराला ज्या किंमतीने किंवा दराने वनोत्पादनाची विक्री किंवा पुरवठा करावयाचा आहे त्या किंमतीत किंवा दरात, सुधारणा करते वेळी, कोणत्याही अशा करारात घालून दिलेली, वाढ करण्याबाबतची कोणतीही कमाल मर्यादा काढून टाकण्याची किंवा त्यात कोणताही फेरफार करण्याची तरतूद करणे;

(क) खरेदीदाराला वनोत्पादनाची, विक्री किंवा पुरवठा करण्याच्या प्रयोजनासाठी किंवा त्यासाठी किंमत किंवा दर आकारण्याच्या किंवा तो वसूल करण्याच्या प्रयोजनासाठी ते ज्या वजनाच्या किंवा मापाच्या घटकाने (युनिटने) तोलले, मापले किंवा मोजले जाणार असेल त्या वजनाच्या किंवा मापाच्या घटकांत खरेदीदाराला विक्री करण्याचे किंवा पुरवठा करण्याचे कबूल केलेल्या वनोत्पादनाच्या प्रमाणात विशेष किंवा भरीव असा बदल न करता, सुधार किंवा बदल करण्याची तरतूद करणे.

४. (१) कलम ३ अन्वये किंमतीत किंवा दरात कोणतीही सुधारणा करतेवेळी निश्चित करावयाची वनोत्पादनाच्या विक्रीची किंवा ती पुरवण्याची किंमत किंवा दर हा, राज्य शासन विहित रीतीने निश्चित करील त्याप्रमाणे, अशी सुधारणा करतेवेळीच्या वनोत्पादनाच्या बाजारमूल्यापेक्षा अधिक असणार नाही.

(२) सुधारणा करतेवेळी किंमत किंवा दर हा एकावेळी बारा महिन्यांपेक्षा अधिक होणाऱ्या मुदतीसाठी निश्चित करण्यात आलेला असेल त्याबाबतीत सुधारित किंमत किंवा दर जेवढ्या कालावधीसाठी अंमलात राहणार असेल त्या कालावधीतील वनोत्पादनाच्या बाजारमूल्यातील अपेक्षित वृद्धीदाखल राज्य शासनास किंमतीमध्ये किंवा दरामध्ये, वार्षिक वाढ करण्याची तरतूद करता येईल.

खरेदीदाराला विकण्यात किंवा पुरविण्यात आलेल्या वनोत्पादनाची किंमत किंवा दर बाजार-मूल्यापेक्षा अधिक नसणे.

५. (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात आणि त्या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेला अस्तित्वात असलेल्या कोणत्याही करारात किंवा हा अधिनियम अंमलात येण्याच्या तारखेला किंवा त्यानंतर, कोणत्याही खरेदीदाराबरोबर राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही करारात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास कराराच्या, वेळोवेळी सुधारण्यात आल्या-प्रमाणेच्या अटी व शर्तींपैकी कोणत्याही अटी व शर्तींचा खरेदीदाराने भंग केल्यास, कोणत्याही वेळी, खरेदीदाराला करार संपुष्टात का आणू नये यासंबंधीचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी देऊन आणि त्याला अशा समाप्तीसाठी एक महिन्याची नोटीस देऊन, तो करार संपुष्टात आणता येईल;

(२) अशा प्रकरणांतील राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

अटी व शर्ती यांचा भंग केल्यामुळे करार संपुष्टात आणण्याचा शासनाचा अधिकार.

६. कलम ३ खाली, कराराच्या अटी व शर्तींमध्ये केलेली कोणतीही सुधारणा किंवा त्या कलमाखाली वनोत्पादनाच्या विक्रीच्या किंवा पुरवठ्याच्या किंमतीत किंवा दरात केलेली कोणतीही सुधारणा खरेदीदाराला मान्य नसेल तर, त्याच्या स्वतःच्या विकल्पानुसार यथास्थिति अटी व शर्तींतील सुधारणा किंवा किंमतीतील अथवा दरातील सुधारणा त्याला कळवल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या मुदतीत, एक महिन्याची लेखी नोटीस देऊन, करार संपुष्टात आणता येईल आणि तदनुसार नोटिशीच्या मुदतीच्या अखेरीस करार संपुष्टात येईल.

एक महिन्याची नोटीस देऊन खरेदीदाराला करार संपुष्टात आणता येईल.'

७. (१) राज्य शासनास, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून आणि **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करून या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्ववर्ती उपबंधांच्या सर्वसाधारणतेस बाधा न आणता, असे नियम हे पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींकरिता करता येतील :—

(अ) करारात जी सुधारणा करण्याचे योजिले असेल किंवा कलम ३ अन्वये किंमतीत किंवा दरात जी सुधारणा करण्याचे योजिले असेल तिची नोटीस देणे आणि त्या प्रस्तावाविरुद्ध कारण दाखवण्याची खरेदीदाराला संधी देणे;

(ब) कलम ४ च्या प्रयोजनांसाठी बाजारभाव कोणत्या तत्त्वांवर कोणत्या रीतीने व कोणत्या प्राधिकाऱ्याकडून ठरवण्यात येईल ते ठरवणे.

(३) ह्या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधान-मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील, तर, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून यथास्थिति अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येतील किंवा येणार नाहीत. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

नियम करण्याचा अधिकार.

(यथार्थ अनुवाद)

**न. ब. पाटील,**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.